| | |
|---|---|
| MHYA050052012013 | दाखल तारीख : २७/१२/२०१३<br>नोंदणी तारीख : २७/१२/२०१३<br>निकाल तारीख : ०२/०५/२०२६<br>कालावधी : १२व. ०४म. ०५दि. |

## न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (३ रे न्यायालय) पुसद यांच्या न्यायालयात

(पिठासीन अधिकारी श्री. ए. बी. जाधव)

**नियमित फौजदारी खटला क्र. ११३९/२०१३** **निशाणी क्र. १९**

**नमुना-अ**

| | |
|---|---|
| **फिर्याद** | महाराष्ट्र शासन तर्फे पोलिस स्टेशन अंमलदार,<br>पोलीस स्टेशन पुसद शहर,ता.पुसद<br>जिल्हा यवतमाळ. |
| **उपस्थिती** | सरकार तर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता,<br>**श्री. आर.डी.राहाणे** |
| **आरोपी** | **शेख अनवर शेख महेबुब,**<br>वयः- ३५ वर्षे, व्यवसायः- मजुरी<br>रा. मुलतानवाडी, पुसद, ता. पुसद, जि. यवतमाळ |
| **उपस्थिती** | आरोपीतर्फे विधिज्ञ श्री ए. एन. भालेराव |

**नमुना-ब**

| | |
|---|---|
| घटना दिनांक | दिनांक २१/१०/२०१३ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | दिनांक २१/१०/२०१३ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | दिनांक ३०/०७/२०१४ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | दिनांक ०१/१०/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवलेली तारीख | ---------------निरंक------------- |
| न्यायनिर्णय तारीख | दिनांक ०२/०५/२०२६ |
| शिक्षेची तारीख, जर असेल तर | ----------------निरंक------------- |

## नमुना-क

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जमानत वर आरोपीस मुक्त केल्याचा दिनांक | कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा | फौ.प्र. सं. कलम ४२८ अन्वये किती दिवस तुरुंगामध्ये राहिले होते. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **शेख अनवर शेख महेबुब** | २१/१०/ २०१३ | २२/१०/ २०१३ | भा.दं.वी ३२४, ५०४, ५०६, ३४ | निर्दोष | निरंक | निरंक |

## नमुना-ड

### सरकारी साक्षीदार/ बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाचे साक्षीदार यांची यादी

### अ- सरकारी साक्षीदार

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.०१ | शेख मुक्तार अली | साक्षीदार |
| सा.क्र.०२ | शेख इर्षाद शेख गुलाब | साक्षीदार |

### ब- बचावपक्ष साक्षीदार

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

### क- न्यायालय साक्षीदार

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

### सरकारी साक्षीदार/ बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाचे साक्षीदार यांची निशानी

**अ-सरकारी**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निरंक | जबानी रिपोर्ट सही |

**ब-बचावपक्ष**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क-न्यायालय**

| अ.क्र. | निशानी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड-जप्त मुद्देमाल**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

(दिनांक ०२/०५/२०२६ रोजी पारीत)

आरोपी विरूध्द भारतीय दंड संहिता कलम ३२४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये दंडनिय असणा-या अपराधा करिता खटला चालविण्यात येत आहे.

**अभियोगपक्षाच्या खटल्याची हकिकत थोडक्यात खालील प्रमाणेः**

**२.** दिनांक २१/१०/२०१३ रोजी रात्री ०८.०० वाजता फिर्यादी शिवाजी चौकातुन घराकडे जात असता त्यांना आरोपी भेटला. आरोपीने फिर्यादीसोबत जुन्या भांडणावरून वाद केला व मारहाण केली. आरोपीने त्यांच्या हातात असलेला कु-हाडीचा दांडा फिर्यादीच्या उजव्या डोळ्याच्यावर मारला त्यामुळे उजव्या डोळ्याच्यावर जखम होवुन रक्त निघाले. फिर्यादी खाली पडले तेव्हा आरोपी त्यांना शिवीगाळ करून जिवे मारण्याच्या धमक्या देवु लागले. म्हणून फिर्यादीने पोलीस ठाणे पुसद शहर येथे जावून

आरोपीविरुध्द तक्रार दिली.

३. फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा क्र. ३८६/२०१३ भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्हयाचा तपास पो.उपनि. श्री सखाराम सुरोशे यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी साक्षदारांचे बयाण नोंदविले, घटनास्थळ पंचनामा केला. तपासाअंती आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपीविरुध्द उपरोक्त कलमाखाली दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपी विरुध्द निशाणी क्र. ११ प्रमाणे दोषारोप ठेवून तो त्यांना त्याचे भाषेत वाचुन व समजावुन सांगितला. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे सांगून संपरिक्षेची मागणी केली.

५. अभिलेखावर आरोपीविरुध्द गुन्हा दर्शक पुरावा आला असल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३(१)(ब) खाली आरोपीचे निवेदन नि.क्र. .... अन्वये नोंदविण्यात आले. सदर निवेदनात फिर्यादीने खोटी केस केली असल्याचा बचाव आरोपीने घेतला. दिनांक ०३/११/२०२५ रोजीच्या निशाणी क्र. १ च्या आदेशानुसार अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

६. दोन्ही पक्षाच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद व न्यायालयासमोर आलेला तोंडी पुरावा आणि दाखल कागदपत्रावरुन माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत. त्याचे निष्कर्ष मी खालील प्रमाणे कारणमिमांसेसह देत आहे.

| **अ.क्र.** | **वाद मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक २१/१०/२०१३ रोजी रात्री ०८.०० वाजताचे दरम्यान शिवाजी चौक पुसद येथे आरोपीने फिर्यादीस कु-हाडीच्या दांड्याने मारुन जखमी केले व त्याद्वारे भारतीय दंड विधान कलम ३२४ नुसार गुन्हा केला ? | **नाही** |

| | | |
|---|---|---|
| २. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय वर नमुद कालावधी आणि ठिकाणी आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ केली जेणेकरुन सार्वजनिक शांतता भंग होईल व त्याद्वारे भारतीय दंड विधानचे कलम ५०४ नुसार दंडनीय अपराध केला आहे ? | **नाही** |
| ३. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय वर नमुद कालावधी आणि ठिकाणी आरोपीने फिर्यादीस जीवे मारण्याची धमकी दिली व त्याद्वारे भारतीय दंड विधानचे कलम ५०६ नुसार दंडनीय अपराध केला आहे ? | **नाही** |
| ४. | काय आदेश ? | **आरोपींची निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुददा क्र. १ ते ३ करिता</u>**

**७.** वरील सर्व वाद मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी एकत्रित चर्चेकरीता घेतले आहे. अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी साक्षीदार क्र. १ शेख मुक्तार अली यांना निशानी १४ वर तपासले आहे. त्यांनी त्यांच्या साक्षीत असे सांगितले आहे की, तो फिर्यादीचा भाऊ आहे. फिर्यादीचे निधन ७ ते ८ वर्षापूर्वीच झाले आहे. घटना कधी घडली हे त्यांना आठवत नाही. तसेच त्याने पुढे असे सांगितले आहे की, फिर्यादीने त्यांना आरोपीने पायावर मारहाण केली याबाबत सांगितले होते. तसेच साक्षीदार क्र. २ ने त्याच्या साक्षीत असे सांगितले आहे की, फिर्यादी त्यांचा सख्खा भाऊ होता व तो आजारामुळे मरण पावला. तसेच फिर्यादीने त्यांना आरोपीसोबत भांडण झाल्याची बाब सांगितली होती. प्रस्तुत प्रकरणात वेळोवेळी अभियोग पक्षाला संधी देऊन सुध्दा इतर साक्षीदार तपासले नाहीत. त्यामुळे पुरावा बंद केला. प्रस्तुत प्रकरणातील अभिलेखावरील साक्षी पुराव्याचे बारकाईने

अवलोकन केले असता साक्षीदारांचा पुरावा हा प्रत्यक्ष स्वरूपाचा नसुन अप्रत्यक्ष स्वरूपाचा असल्याचा दिसुन येतो. त्याउलट फिर्यादी हा मयत असल्यामुळे त्याची साक्ष अभिलेखावर नोंदविण्यास अभियोग पक्ष असमर्थ ठरला. अभिलेखावरील साक्षी पुरावा हा आरोपीला गुन्ह्यात दोषी धरण्या इतपत पूरक स्वरूपाचा नसल्यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र. ४ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| **१** | आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) नुसार, भारतीय दंड संहिता कलम ३२४, ५०४ व ५०६ नुसार गुन्हा केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| **२.** | आरोपीने दिलेला वैयक्तिक जातमुचलका व जामीन कदबा रदद करण्यात येत आहे. |
| **३.** | आरोपीने रक्कम रुपये ५०,०००/- (रुपये पन्नास हजार फक्त) चे वैयक्तिक बंधपत्र व जामीन बंधपत्र रुपये ५०,०००/- कलम ४३७-अ फौजदारी प्रक्रिया संहिते अंतर्गत दयावे व सदर जामीन बंधपत्र सहा महिनेपर्यंत अस्तित्वात राहील. |
| **४.** | प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक कु-हाडीचा लाकडी दांड्याची कायदयाप्रमाणे अपील कालावधीनंतर विल्हेवाट लावावी. |
| | **न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.** |

स्वा/-

दिनांकः ०२/०५/२०२६

**(ए. बी. जाधव )**

३रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पुसद